जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

24 FEB 2024
सकाळ






कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शिवस्पंदन महोत्सवांतर्गत आयोजित लोकवाद्य महोत्सव व प्रदर्शनाचे हलगीवादनाने उद्‌घाटन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत (डावीकडून) डॉ. प्रकाश गायकवाड, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे. दुसऱ्या छायाचित्रात लोकवाद्य महोत्सवात मुख्य प्रशासकीय इमारतीसमोरील परिसरात सादरीकरण करताना विद्यार्थी.

# विद्यापीठात घुमला लोकवाद्यांचा नाद

## शिवस्पंदन महोत्सव : कुलगुरूंनी हलगी वाजवून केले सांगीतिक उद्‌घाटन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २३ : शिवाजी विद्यापीठात विद्यार्थी विकास विभागातर्फे आयोजित शिवस्पंदन महोत्सवात आज अखेरच्या दिवशी देशभरातील विविध ७५ लोकवाद्यांचा आवाज घुमला. ज्या वाद्यांचा आवाज आणि संगीत हे कित्येकदा सांगीतिक ध्वनिफिती अथवा चित्रपटांमधूनच कानी येतात, अशा वाद्यांना प्रत्यक्ष पाहणं आणि त्यांचं नादावून टाकणारं संगीत ऐकणं, ही नागरिकांसाठी पर्वणी ठरली.

आज सकाळी साडेसात ते साडेनऊ यावेळेत लोकवाद्य वादन महोत्सव झाला. उपक्रमांतर्गत चार राज्यांतील

> 'विद्यापीठाने देशभरात वाजविल्या जाणाऱ्या विविध लोकवाद्यांचा महोत्सव आयोजित करून त्यांचे वादन आणि प्रदर्शन या माध्यमातून देशाच्या सांगितिक परंपरेशी असणारे नाते वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न केला आहे. यातून ही परंपरा जतन करण्याबरोबरच त्यांची माहिती नागरिकांना होणे, ही भावना आहे.
>
> **- डॉ. डी. टी. शिर्के**, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

वाद्ये विद्यापीठाच्या परिसरात चार दिशांना वाजविली.

छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यासमोरील परिसरात सकाळी साडेसात वाजता कुलगुरू डॉ.डी. टी. शिर्के यांनी हलगी वाजवून उपक्रमाचे सांगितिक उद्‌घाटन केले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी ढोल, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी डफ आणि अधिसभा सदस्य धैर्यशील यादव यांनी चौंडकं वाजवून या समारंभात रंगत आणली. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुतळ्यासमोरील परिसर, संगीत व नाट्यशास्त्र विभागाशेजारील तलाव आणि क्रांतीवन या ठिकाणीही विविध लोकवाद्यांचे वादन करण्यात आले.

ढोलकी, ढोलक, पखवाज, मृदुंग, खोळ, घटम, गंजिरा, खंजिरी, दिमडी, हलगी, पराई, शाहिरी डफ आदी लोकवाद्यांचे राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात प्रदर्शन मांडले. या लोकवाद्यांचे पुन्हा एकत्रित सादरीकरण करण्यात आले. दीपक बीडकर आणि संदीप जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली घेतलेल्या उपक्रमात ऋषिकेश देशमाने, शंतनू पाटील, नितीन शिंदे, तेजस गोविलकर, गणेश इंडीकर, मयुरेश शिखरे, अभय हावळ, सुजल कांबळे, कौस्तुभ शिंदे, अनिकेत देशपांडे, प्रशिक कांबळे, प्रतीक जाधव, सुमंत कुलकर्णी, हर्षदा परीट, सूरज कांबळे, धीरज खोत, अक्षय कडोले आणि पृथ्वीराज माळी यांनी सादरीकरण केले. सकाळच्या सत्रात एकल आणि समूह नृत्य स्पर्धा झाल्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 FEB 2024
पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शिवस्पंदन लोकवाद्य महोत्सव व प्रदर्शनाचे हलगीवादनाने उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. प्रकाश गायकवाड, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे.

# लोकवाद्यांनी निनादला शिवाजी विद्यापीठ परिसर

## वाद्यमहोत्सव, प्रदर्शनास विद्यार्थी, नागरिकांचा प्रतिसाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात विद्यार्थी विकास विभागातर्फे सुरू असलेल्या 'शिवस्पंदन' महोत्सवात अखेरच्या दिवशी देशभरातील ७५ लोकवाद्यांच्या वादनाचा आस्वाद घेण्यासाठी नागरिकांनी उत्स्फूर्त उपस्थिती दर्शविली. सांगीतिक ध्वनिफिती, चित्रपटांमधूनच कानी पडणाऱ्या वाद्यांना प्रत्यक्ष पाहणे, त्यांचे नादावून टाकणारं संगीत ऐकणे ही नागरिकांसाठी पर्वणी ठरली.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या संकल्पनेतून लोकवाद्य महोत्सव व प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. शुक्रवारी सकाळी ७.३० ते ९.३० या कालावधीत लोकवाद्य वादन महोत्सव झाला. देशाच्या चार दिशांकडील राज्यांतील वाद्ये विद्यापीठाच्या परिसरात चार दिशांना वाजविण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यासमोरील परिसरात कुलगुरू डॉ. शिर्के यांनी हलगी वाजवून उपक्रमाचे सांगीतिक उद्घाटन केले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी ढोल व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी डफ तर अधिसभा सदस्य धैर्यशील यादव यांनी चौडक वाजवून रंगत आणली. शाहिरी डफ, हलगी, ढोलकीपासून ते भोरताल, झेंगाट, बंगाली ढोल, पहाडी मांदल आदी देशभरातील लोकवाद्याचे वादन झाले.

त्याखेरीज कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुतळ्यासमोरील परिसर, संगीत व नाट्यशास्त्र विभागाशेजारील तलाव व क्रांतीवन या ठिकाणी विविध लोकवाद्यांचे वादन करण्यात आले. लोकवाद्यांचे सकाळी १० ते १ आणि सायंकाळी ४ ते ७ वाजेपर्यंत राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात प्रदर्शन मांडण्यात आले. प्रत्येक वाद्याचा माहितीफलक देण्यात आला होता. विद्यापीठातील विद्यार्थ्यांसह महाविद्यालयीन विद्यार्थी, शालेय विद्यार्थ्यांनी प्रदर्शनाला भेट देऊन वाद्यांची माहिती घेतली. दुपारी १.३० ते ३.३० वा. या कालावधीत राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात लोकवाद्यांचे पुन्हा एकत्रित सादरीकरण झाले. सकाळच्या सत्रात राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात शिवस्पंदन महोत्सवातील अखेरच्या एकल व समूह नृत्य स्पर्धा पार पडल्या.

> शिवाजी विद्यापीठाने देशभरातील लोकवाद्यांचा महोत्सव आयोजित करून त्यांचे वादन, प्रदर्शन या माध्यमातून देशाच्या सांगितिक परंपरेशी असणारे नाते वृद्धिंगत केले आहे. दरवर्षी अशा प्रकारचा उपक्रम विद्यापीठात आयोजित केला जावा, त्यामध्ये अधिकाधिक वाद्यांची भर पडावी व रसिक कोल्हापूरकर नागरिकांना त्यांचा आस्वाद घेता यावा, या दृष्टीने प्रयत्न करण्यात येतील.
>
> **- डॉ. डी.टी. शिर्के,**
> कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ

2 4 FEB 2024
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात लोकवाद्यांचा निनाद

## वाद्यमहोत्सव आणि प्रदर्शनाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात विद्यार्थी विकास विभागातर्फे सुरू असलेल्या तीनदिवसीय शिवस्पंदन महोत्सवात शुक्रवारी अखेरच्या दिवशी आयोजित करण्यात आलेल्या विशेष लोकवाद्य महोत्सवामुळे विद्यापीठ परिसर लोकवाद्यांच्या निनादाने अक्षरशः न्हाऊन निघाला. लोकवाद्यांचे संगीत ऐकणे, ही नागरिकांसाठी पर्वणीच ठरली. देशभरातील ७५ लोकवाद्यांच्या वादनाचा आस्वाद घेण्यासाठी नागरिकांनी उत्स्फूर्त उपस्थिती दर्शविली.

भारताच्या स्वातंत्र्यास ७५ वर्षे पूर्ण होत असताना देशभरातील ७५ लोकवाद्यांचे वादन आणि प्रदर्शन शिवाजी विद्यापीठात



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात लोकवाद्य महोत्सव व प्रदर्शनाचे हलगीवादनाने उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आदी मान्यवर.**

आयोजित करण्याचा कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांचा मानस होता. त्यांच्याच संकल्पनेतून आणि प्रेरणेतून लोकवाद्य महोत्सव व प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. लोकवाद्य वादन महोत्सव या उपक्रमांतर्गत देशाच्या चार दिशांकडील राज्यांतील वाद्ये विद्यापीठाच्या परिसरात चार दिशांना वाजविण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यासमोरील परिसरात सकाळी साडेसात वाजता कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी हलगी वाजवून या उपक्रमाचे सांगितिक उद्घाटन केले. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी ढोल, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी डफ आणि अधिसभा सदस्य धैर्यशील यादव यांनी चौडकं वाजवून या उद्घाटन समारंभात रंगत आणली.

या सर्व लोकवाद्यांचे राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात प्रदर्शन मांडण्यात आले. दुपारी या लोकवाद्यांचे एकत्रित सादरीकरण करण्यात आले.

दीपक बीडकर आणि संदीप जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या या उपक्रमात ऋषीकेश देशमाने, शंतनू पाटील, नितीन शिंदे, तेजस गोविलकर, गणेश इंडीकर, मयुरेश शिखरे, अभय हावळ, सुजल कांबळे, कौस्तुभ शिंदे, अनिकेत देशपांडे, प्रशिक कांबळे, प्रतीक जाधव, सुमंत कुलकर्णी, हर्षदा परीट, सूरज कांबळे, धीरज खोत, अक्षय कडोले आणि पृथ्वीराज माळी यांनी विविध वाद्यांचे सादरीकरण केले.

24 FEB 2024 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोकवाद्यांनी निनादले विद्यापीठ

## शिवस्पंदन महोत्सवाची अखेर : वाद्यमहोत्सवाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने सुरू असलेल्या तीनदिवसीय शिवस्पंदन महोत्सवात शुक्रवारी (दि. २३) अखेरच्या दिवशी विद्यापीठ परिसर लोकवाद्यांच्या निनादाने अक्षरशः न्हाऊन निघाला. ज्या वाद्यांचा आवाज आणि संगीत हे कित्येकदा सांगीतिक ध्वनिफिती अथवा चित्रपटांमधूनच कानी येतात, अशा वाद्यांना प्रत्यक्ष पाहणे व मनाला हरवून टाकणारे संगीत ही पर्वणीच ठरली. देशभरातील ७५ लोकवाद्यांच्या वादनाचा आस्वाद घेण्यासाठी नागरिकांनी उत्स्फूर्त उपस्थिती दर्शविली.

देशाच्या चार दिशांकडील राज्यांतील वाद्ये विद्यापीठाच्या परिसरात चारही दिशांना वाजविण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यासमोरील परिसरात सकाळी साडेसात वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी हलगी वाजवून या उपक्रमाचे सांगीतिक उद्घाटन केले. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी ढोल, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी डफ, तर अधिसभा सदस्य धैर्यशील यादव यांनी चौंडके वाजवून उद्घाटन समारंभात रंगत आणली. त्याखेरीज कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुतळ्यासमोरील परिसर, संगीत व नाट्यशास्त्र विभागाशेजारील तलाव आणि क्रांतिवन या ठिकाणीही विविध लोकवाद्यांचे वादन करण्यात आले.



शिवाजी विद्यापीठात लोकवाद्य महोत्सवात क्रांतिवन परिसरात विद्यार्थ्यांनी लोकवाद्यांचे सादरीकरण केले. (छाया : आदित्य वेल्हाळ)

### या लोकवाद्यांचे झाले वादन

ढोलकी, ढोलक, पखवाज, मृदंग, खोळ, घटम, गंजिरा, खंजिरी, दिमडी, हलगी, पराई, शाहिरी डफ, डफ, डफडे, फायबर हलगी, खमक, बुगचू, भपंग, चौंडके, डमरू, डडक्का, डवर, उडुक्काई, बगलबच्चा, दडू, छिंद आदी.

या सर्व लोकवाद्यांचे राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात प्रदर्शन मांडण्यात आले. विद्यापीठातील विद्यार्थ्यांसह महाविद्यालयीन विद्यार्थी, शालेय विद्यार्थ्यांनीही या प्रदर्शनाला भेट देऊन वाद्यांची माहिती घेतली. दुपारी १.३० ते ३.३० वेळेत या कालावधीत राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात या लोकवाद्यांचे पुन्हा एकत्रित सादरीकरण करण्यात आले होते.

तत्पूर्वी, सकाळच्या सत्रात राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात शिवस्पंदन महोत्सवातील अखेरच्या एकल नृत्य आणि समूह नृत्य स्पर्धा पार पडल्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 FEB 2024
सकाळ

# विद्यापीठ सल्लागार समिती सदस्यपदी कांचन परुळेकर


कांचन परुळेकर

कोल्हापूर: शिवाजी विद्यापीठाच्या सल्लागार समितीच्या सदस्यपदी 'स्वयंसिद्धा'च्या संचालिका कांचन परुळेकर यांची कुलपती तथा राज्यपाल रमेश बैस यांनी निवड केली आहे. त्याबाबतचे पत्र त्यांना कुलपती कार्यालयाकडून गुरुवारी प्राप्त झाले आहे. सामाजिक कार्यकर्त्या या विभागातून त्यांची या समितीवर निवड झाली आहे. या पदावर काम करण्याची संधी मिळाल्याचा आनंद आहे, त्याच्या माध्यमातून उच्च शिक्षण क्षेत्रात नवीन काही शिकण्याची आणि चांगले काम करण्याची संधी मिळणार असल्याची प्रतिक्रिया परुळेकर यांनी व्यक्त केली.

24 FEB 2024
महासत्ता
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ उपकेंद्रासाठी १०० कोटींची तरतूद करा

## उपमुख्यमंत्री पवार यांचे आदेश | वैभव पाटील यांची माहिती

विटा,ता.२३(प्रतिनिधी)-

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी खानापूर येथे होणाऱ्या प्रस्तावित शिवाजी विद्यापीठाच्या उपकेंद्रासाठी १०० कोटींच्या तरतुदी संदर्भात संबंधितांना आदेश दिले आहेत, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष वैभव पाटील यांनी दिली आहे.

शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र खानापूर येथे व्हावे यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेमध्ये सिनेट सदस्य वैभव पाटील यांनी ठराव मांडला होता. हा ठराव मंजूर झाल्यानंतर खानापूर येथे जागा निश्चिती ठराव व जागेचा विद्यापीठाच्या मॅनेजमेंट कौन्सिलमध्ये ठराव मंजूर करून घेतल्यावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन प्रस्तावानुसार उपकेंद्रासाठी १०० कोटीची आर्थिक तरतूद तात्काळ करावी, अशी मागणी वैभव पाटील यांनी केली. या मागणीनुसार उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तात्काळ उपकेंद्रासाठी १०० कोटीची आर्थिक तरतूद मंजुरीसाठीचे आदेश दिल्याचे माहिती वैभव पाटील यांनी दिली.



मुंबई : उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मागणीचे निवेदन देताना शिवाजी विद्यापीठ सिनेट सदस्य वैभव पाटील व अन्य.

यावेळी हे उपकेंद्र खानापूर येथे सुरु झाले तर दुष्काळी भागाला न्याय मिळेल शिवाय खानापूरसह आटपाडी,कवठेमहांकाळ, जत, कडेगाव, पलूस, तासगाव व माण तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या सोयीचे मध्यवर्ती ठिकाण म्हणून खानापूर उपयोगी ठरेल, असे वैभव पाटील यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना सांगितले. दरम्यान, वैभव पाटील यांनी प्रस्तावानुसार उपकेंद्रासाठी १०० कोटीची आर्थिक तरतुदीसाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन प्रयत्न केल्याबद्दल खानापूर घाटमाथ्यावरील नागरिक, युवक समाधान व्यक्त करत आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 FEB 2024
सकाळ

# 'ऑनलाईन एमबीए'च्या शुल्कात आजी-माजी विद्यार्थ्यांना सवलत

## विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेची मान्यता

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २३ : राज्य विद्यापीठांमध्ये पहिल्यांदा ऑनलाईन एमबीए अभ्यासक्रम शिवाजी विद्यापीठात सुरू होणार आहे. या अभ्यासक्रमासाठी आजी-माजी विद्यार्थ्यांसह विद्यापीठाच्या अन्य घटकांना शैक्षणिक शुल्कात दहा टक्के सवलत लागू करण्यास विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेने आज मान्यता दिली.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली व्यवस्थापन परिषदेची बैठक झाली. दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रामध्ये एमबीए अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता मिळाली आहे. त्याअनुषंगाने अभ्यासक्रमासाठी लागणाऱ्या शिक्षक पदांची संख्या, त्यांचे एकत्रित मानधन, आदींबाबत या बैठकीत निर्णय घेण्यात आला. विद्यापीठ आणि कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील संलग्नित महाविद्यालयांमधील आजी-माजी विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पाल्य, दिव्यांग, महिला, तृतीयपंथीय यांना अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक शुल्कामध्ये दहा टक्के सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला. विद्यापीठ आणि स्वीडनमधील मिड युनिव्हर्सिटी यांच्यादरम्यान सामंजस्य करारास मान्यता देण्यात आली. कोल्हापूर महानगरपालिकेने विद्यापीठाला पाठवलेल्या पाणी आणि सांडपाणी कराच्या बिलाबाबत प्रशासकांना भेटून चर्चा करण्यासाठी समिती नियुक्त करण्यात आली.

### 'एमसीक्यू' स्वरूपात परीक्षा

व्यवस्थापन परिषदेच्या पूर्वी विद्या परिषदेची बैठक झाली. त्यात ऑनलाईन एमबीए अभ्यासक्रमाबाबत चर्चा झाली. त्यात या अभ्यासक्रमासाठीची प्रवेश परीक्षा आणि दोन वर्षे अनुभवाची अट रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. सत्र (सेमिस्टर) परीक्षा एमसीक्यू स्वरूपात घेण्यास विद्या परिषदेने मान्यता दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 FEB 2024
लोकमत

# शिवाजी विद्यापीठात २६ पासून विज्ञान सप्ताह

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात येत्या २६ फेब्रुवारी ते २ मार्च या कालावधीत राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विविध उपक्रम आयोजित केले आहेत.

यंदा 'विकसित भारतासाठी स्वदेशी तंत्रज्ञान' हा विषय घेण्यात आला असून, त्याच अनुषंगाने तज्ज्ञांची व्याख्याने, प्रकल्प स्पर्धा व अन्य उपक्रम आयोजित केल्याची माहिती इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागाचे प्रमुख डॉ. पवन गायकवाड, डॉ. समन्वयक डॉ. मुरलीधर भानारकर यांनी दिली.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते सोमवारी (दि. २६) सकाळी १०:३० वाजता पदार्थविज्ञान अधिविभागाच्या सभागृहात राष्ट्रीय विज्ञान दिन समारंभाचे उद्घाटन होईल., यावेळी गोवा विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. आर. एस. गड यांचे बीजभाषण होईल. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असेल. २७ फेब्रुवारी रोजी सकाळी ११:३० वाजता कोल्हापूरच्या डॉ. दीपक शेटे यांचे आणि २८ फेब्रुवारीला सकाळी ११:३० वाजता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागाचे प्रमुख डॉ. सतीश शर्मा यांचे व्याख्यान होईल. याखेरीज विज्ञान प्रदर्शन, प्रकल्प स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा होणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

24 FEB 2024 पुढारी

# शिवाजी विद्यापीठात सोमवारपासून राष्ट्रीय विज्ञान सप्ताह

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात २६ फेब्रुवारी ते २ मार्च या कालावधीत राष्ट्रीय विज्ञान दिन सप्ताहानिमित्त विविध उपक्रम आयोजित केले आहेत. 'विकसित भारतासाठी स्वदेशी तंत्रज्ञान' हा यंदाचा विषय आहे. त्या अनुषंगाने तज्ज्ञांची व्याख्याने, प्रकल्प स्पर्धा होणार असल्याची माहिती इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागाचे प्रमुख डॉ. पवन गायकवाड, डॉ. समन्वयक डॉ. मुरलीधर भानारकर यांनी दिली.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते सोमवारी (दि. २६) सकाळी १०.३० वाजता पदार्थविज्ञान अधिविभागाच्या सभागृहात राष्ट्रीय विज्ञान दिन समारंभाचे उद्घाटन होईल. गोवा विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. आर. एस. गड यांचे बीजभाषण होईल.

प्र.-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असेल.

दि. २७ रोजी सकाळी ११.३० वाजता डॉ. दीपक शेटे यांचे व २८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११.३० वाजता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागाचे प्रमुख डॉ. सतीश शर्मा यांचे व्याख्यान होईल. विज्ञान प्रदर्शन (दि. २७), प्रकल्प स्पर्धा (दि. २८), निबंधलेखन व वक्तृत्व स्पर्धा (दि. २९), प्रश्नमंजुषा स्पर्धा (दि. १ मार्च), समारोप समारंभ व पारितोषिक वितरण (दि. २ मार्च) असे उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 FEB 2024
सकाळ

# शिवाजी विद्यापीठात सोमवारपासून राष्ट्रीय विज्ञान सप्ताह

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २३ : शिवाजी विद्यापीठात सोमवार (ता.२६) ते शनिवार (ता. २ मार्च) दरम्यान राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त आठवडाभर विविध उपक्रम होणार आहेत. यंदा 'विकसित भारतासाठी स्वदेशी तंत्रज्ञान' हा विषय घेतला असून त्याच अनुषंगाने तज्ज्ञांची व्याख्याने, प्रकल्प स्पर्धा व अन्य उपक्रम आयोजित केल्याची माहिती इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागाचे प्रमुख डॉ. पवन गायकवाड आणि समन्वयक डॉ. मुरलीधर भानारकर यांनी दिली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते सोमवारी सकाळी साडेदहा वाजता पदार्थ विज्ञान अधिविभागाच्या सभागृहात राष्ट्रीय विज्ञान समारंभाचे उद्‌घाटन होईल. यावेळी गोवा विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. आर. एस. गड यांचे बीजभाषण होईल. मंगळवारी सकाळी साडेअकरा वाजता डॉ. दीपक शेटे यांचे आणि बुधवारी सकाळी साडेअकरा वाजता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागाचे प्रमुख डॉ. सतीश शर्मा यांचे व्याख्यान होणार आहे. विज्ञान प्रदर्शन, प्रकल्प स्पर्धा, निबंधलेखन व वक्तृत्व स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा होणार असल्याची माहिती डॉ. गायकवाड यांनी दिली.

24 FEB 2024 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# संख्याशास्त्रात करिअरच्या अनेक संधी

## डॉ. अनिल गोरे; विद्यापीठात संख्याशास्त्र परिसंवादास प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

संख्याशास्त्राच्या विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांमध्ये करिअर व सेवेच्या अनेक संधी आहेत. मात्र, त्यासाठी नवनवीन बदलांना विद्यार्थ्यांनी सामोरे गेले पाहिजे, असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागाचे निवृत्त प्रमुख डॉ. अनिल गोरे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा संख्याशास्त्र अधिविभाग व शिवाजी विद्यापीठ संख्याशास्त्र शिक्षक संघटना (सुस्टा) यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त आयोजित दोन दिवसीय परिसंवादाच्या उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के होते. प्रमुख अतिथी म्हणून पुण्याच्या मेट्रिक कन्सल्टन्सीचे संस्थापक-चेअरमन डॉ. आनंद करंदीकर व ज्येष्ठ संख्याशास्त्रज्ञ डॉ. रंगनाथ रटिहळ्ळी उपस्थित होते.



**विद्यापीठात संख्याशास्त्र परिसंवादामध्ये मार्गदर्शन करताना डॉ. अनिल गोरे.**

डॉ. गोरे म्हणाले, जिथे जिथे संख्या आहेत, डाटा आहे, तिथे विश्लेषणाची आवश्यकता आहेच. त्या प्रत्येक ठिकाणी संख्याशास्त्र उपयुक्त आहे. प्रत्येक क्षेत्रात संख्याशास्त्र उपयोजन आवश्यक आहे.

पहिल्या सत्रात 'ज्ञान बनो कर्मशील' या विषयावर डॉ. गोरे यांनी तर 'केस स्टडी अप्रोच इन स्टॅटिस्टिक्स टीचिंग' या विषयावर डॉ. करंदीकर यांनी मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात विविध क्षेत्रांतील समस्यांची उकल करण्यासाठी संख्याशास्त्राचा कसा उपयोग करता येईल, या विषयावर काही निवडक समस्या घेऊन चर्चा करण्यात आली.

डॉ. आनंद करंदीकर यांनी मनोगत व्यक्त केले. अधिविभाग प्रमुख डॉ. शशीभूषण महाडिक यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सोमनाथ पवार यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. सुकुमार राजगुरू यांनी आभार मानले.

24 FEB 2024 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# हक्कांचे रक्षण म्हणजेच देशाचे संरक्षण

## डॉ. श्रीकृष्ण महाजन; वनहक्क कायदा, दावे मार्गदर्शन शिबिर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

वननिवासी व्यक्तीच्या हक्काबरोबरच तिचे सामुदायिक हक्कसुद्धा महत्त्वाचे आहेत. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने वैयक्तिक हक्काबरोबर सामुदायिक हक्कांसाठी संघटित प्रयत्न केले पाहिजेत. एखाद्या व्यक्तीच्या हक्कांचे रक्षण म्हणजे दुसरे काही नसून ते देशाचे संरक्षण आहे, असे प्रतिपादन अधिष्ठाता प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र व खानापूर तालुका अरण्यहक्क संघर्ष समिती यांच्या संयुक्त विद्यमाने वननिवासी अधिनियमाबाबत वन कायदा बाधित लोकांसाठी मार्गदर्शन व वन हक्क दावे अर्ज भरून घेण्याबाबत आयोजित शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात वन कायदा आणि वनहक्क शिबिरात बोलताना प्रा.डॉ. श्रीकृष्ण महाजन.**

ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कॉ. संपत देसाई होते.

अविनाश भाले म्हणाले, वन हक्क कायद्यानुसार वैयक्तिक दाव्या बरोबरच सामुदायिक दावेसुद्धा करणे आवश्यक आहे. हे दावे अर्ज बिनचूक व विहित नमुन्यामध्ये वन हक्क




समितीद्वारे शासनाकडे सादर करावेत. महादेव मरगाळे यांनी स्वागत केले. अभिजित सरदेसाई यांनी प्रास्ताविक केले.

दरम्यान, यावेळी वनहक्क दाव्याचा अर्ज कसा भरावा याचे प्रात्यक्षिक दाखवले. काही दावे अर्ज भरून देण्यात आले. डॉ. किशोर खिलारे , दत्तात्रय घटूकडे , अभिजीत सरदेसाई, बाळासाहेब पाटील यांनी सहकार्य केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 FEB 2024
सकाळ

# सुमित्रा कुलकर्णी यांचे २६ ला व्याख्यान

कोल्हापूर, ता. २३ : शिवाजी विद्यापीठ इतिहास विभागातर्फे सोमवारी (ता. २६) दु. बाराला राजर्षी शाहू सिनेट सभागृहात छत्रपती शिवाजी महाराज व्याख्यानमाला होणार आहे. प्रमुख वक्ते म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रा. डॉ. सुमित्रा कुलकर्णी 'मराठा स्वराज्यनिर्मिती : एक अवलोकन' विषयावर विचार मांडतील.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 FEB 2024

लोकमत

# सुमित्रा कुलकर्णी यांचे सोमवारी व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास विभागामार्फत सोमवारी छत्रपती शिवाजी महाराज व्याख्यानमालेंतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या इतिहास विभागातील माजी विभागप्रमुख आणि मराठा इतिहासाच्या ज्येष्ठ इतिहास संशोधिका प्रा. डॉ. सुमित्रा कुलकर्णी यांचे 'मराठा स्वराज्य निर्मिती : एक अवलोकन' या विषयावर व्याख्यान होणार आहे. राजर्षी शाहू सिनेट सभागृहात दुपारी १२ वाजता हा कार्यक्रम होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
24 FEB 2024 महासत्ता शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठातून आता करता येणार ऑनलाइन एम.बी.ए.

कोल्हापूर,ता.२३(प्रतिनिधी)-

शिवाजी विद्यापीठात आता दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत येत्या शैक्षणिक वर्षापासून ऑनलाईन एम.बी.ए.चा अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे.

शिवाजी विद्यापीठ नॅक ए++' मानांकनप्राप्त असल्याने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मान्यतेने एम.बी.ए., एम.कॉम., एम.एस्सी (गणित), एम.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) इत्यादी अभ्यासक्रम ऑनलाइन पद्धतीने सुरू करण्यास पात्र ठरले. हे अभ्यासक्रम सुरू करण्याची कार्यवाही विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने सुरु आहे. यातील ऑनलाईन एम.बी.ए. अभ्यासक्रम सुरू करण्यास विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता नुकतीच प्राप्त झाली आहे. त्यामुळे ऑनलाईन एम.बी.ए.चा अभ्यासक्रम सुरू करणारे शिवाजी विद्यापीठ हे महाराष्ट्रातील एकमेव राज्य विद्यापीठ ठरले आहे.

तरी इच्छुक विद्यार्थी-विद्यार्थिनींसह नोकरदार, गृहिणी आदी वर्गांनाही आपापले कामाचे व्याप सांभाळत ऑनलाइन एम.बी.ए. अभ्यासक्रमाची पदवी घेता येणार आहे.

अभ्यासक्रम प्रवेश, अध्ययन, परीक्षा व निकालापर्यंतची सर्वच शैक्षणिक प्रक्रिया ऑनलाइन स्वरुपाची असणार आहे. ही पदवी अन्य मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवीशी समकक्ष आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 FEB 2024
लोकमत

# गणित दिनानिमित्त विद्यापीठात उपक्रम

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या गणित अधिविभागात राष्ट्रीय गणित दिनानिमित्त विविध उपक्रम झाले. 'विविध भारतीय गणिततज्ज्ञ आणि त्यांचे गणितातील योगदान' या विषयावरील सादरीकरणाने राष्ट्रीय गणित दिन साजरा झाला. नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील डॉ. सुरेंद्रनाथ रेड्डी यांचे 'डिफरंट काईंड्स ऑफ प्रूफ्स' या विषयावर व्याख्यान झाले. १५ फेब्रुवारीला 'रिप्रेझेंटेशन थिअरी' या विषयावर कार्यशाळा झाली. गणित अधिविभागप्रमुख डॉ. सरिता ठकार यांच्या मार्गदर्शनाखाली हे उपक्रम पार पडले.